# प्रेसनोट

दि.३१/०३/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | नगर तालुका पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.२५७/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | कमलेश युवराज पवार, वय–२९ वर्ष, सहायक अभियंता, वर्ग–२, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत सब स्टेशन चिंचोडी पाटील, ता.नगर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/– रुपये तडजोडी अंती २०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ––– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचे अंभोरा, तालुका आष्टी, जि.बीड येथे आंबेश्वर कृषीवन पर्यटन हे रिसॉर्ट आहे. सदर ठिकाणी त्यांनी महावितरण अहमदनगर शाखा चिचोंडी पाटील यांच्याकडुन विद्युत कनेक्शन घेतलेले आहे. सदर कनेक्शनच्या मीटर मध्ये काहीतरी छेडछाड केले म्हणून सदर मीटर तपासणी करीता यातील आरोपी लोकसेवक कमलेश युवराज पवार, वय–२९ वर्ष, सहायक अभियंता, वर्ग–२, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत सब स्टेशन चिंचोडी पाटील, ता.नगर, जि.अहमदनगर यांनी काढून नेले होते. सदर मीटर पुन्हा जोडून देण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक पवार यांनी तक्रारदार यांच्याकडे आरोपी लोकसेवक यांचे वरिष्ठ उप अभियंता कोपनर यांच्याकरीता रु.५०,०००/– ची मागणी केल्याची तक्रार, तक्रारदार यांनी दिली होती. सदर तक्रारीवरुन लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक पवार यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोड अंती रु.२०,०००/– लाचेची मागणी करुन लाच स्वीकारण्याची तयारी दर्शविली म्हणून आरोपी लोकसेवक कमलेश युवराज पवार याचेविरुध्द नगर तालुका पो.स्टे. गुरनं.२५७/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) प्रमाणे दि.३०/०३/२०२३ रोजी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

31.03

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर